Historicity Research Journal
Volume 2 | Issue 2 | Oct 2015 ISSN:- 2393-8900

Research Article

□बोज : प्राचीनकालीन एक भारतीय वसाहत

श्रीहरी रंगनाथराव पितळे

इतिहास विभाग प्रमुख , स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोड जि. वाशिम.

प्रस्तावना :

भारतदेशाला स्वातंत्र्यापुर्वी एक हजार वर्षांचा गुलामगीरीचा इतिहास होता. महंमद घोरीच्या आक्रमणापासून थेट इ.स. १९४७ मधील स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत भारत अधिकृतरित्या परकीयांचा गुलाम झालेला होता. ही गुलामगीरी भारतीय लोकांच्या इतकी अंगवळणी पडली की ती केवळ राजकीय उरली नाही, तर मानसिक बनली. म्हणूनच आजही भारतीयांची गुलामगीरीची मानसिकता वारंवार सर्वत्र उमटून पडते. ही मानसिकता बदलावयाची असेल तर प्रथमत: आत्माभिमान जागृत करावा लागतो. यादृष्टीने भारताने बाह्य जगतावर कधी वर्चस्व गाजवले होते का ? असा शोध घेताना आग्नेय आशियातील अनेक देश प्राचीनकाळात भारतीय वसाहती असल्याचे स्पष्ट झाले. इंडोचायनाला भारतीय साहित्यात 'सुव□द्विप' अशी संज्ञा होती. मलेशियाला 'मलयव्दिप' व्हिएतनामला 'अन्नाम' आणि 'चंपा' तर थायलंडला 'सयाम' अशी नावे होती. लाओसला 'सुव□भूमी' आणि कंबोडीयाला '□बोज' असे नाव प्राचीन साधनांमध्ये मिळते. यापैकी कंबोडीया (पूर्वीचे '□बोज') या देशावरील भारतीय प्रभाव शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधामध्ये करीत आहोत.

□बोजची उत्पत्ती

□बोज या देशाचा संस्थापक कौंडीण्य या भारतीय ब्राह्मणास मानले जाते. कंबोज हे नावच मुळात कंबु अथवा कौंडीण्य या नावाचे अपभ्रंशित रुप आहे.[१] भारतातून कंबोजमध्ये गेलेल्या या तरुणाने तेथील शासिकेचा पराभव करुन आपले राज्य स्थापन केले. तेथील शासिका मेरा अथवा सोमा हिच्याशी त्याने विवाह केला होता. हा कंबु सुर्यवंशी होता तर सोमा ही चंद्रवंशी होती. या दोघांपासून निर्मा□ झालेल्या वंशाला ख्मेर वंश असे संबोधल्या गेले. पुढे तेथे तीन महत्त्वाच्या राजवंशांनी राज्य केले होते. त्यांची नावे चीनी साधनांमध्ये फुनान साम्राज्य, चेनला साम्राज्य आणि ख्मेर साम्राज्य अशी आढळली आहेत. महाभारत काळात भारताचा कंबोजशी संपर्क असल्याचा पुरावा मिळतो. महाभारत युध्दात कर्णाच्या सैन्यामध्ये कंबोजचा राजपुत्र सुदक्षिण हा आपले सैन्य घेऊन पांडवांविरुध्द लढण्यासाठी आला होता असा संदर्भ मिळतो.[२]

फुनान साम्राज्य

□बोजमध्ये निर्माण झालेले पहिले साम्राज्य फुनान या नावाने ओळखल्या गेले. इ.स. दुसऱ्या शतकापासून या राज्याचा प्रारंभ झाला.[३] या साम्राज्याचा संस्थापक कौंडीण्य हा राजा होता. असाच एक कौंडीण्य दुसरा या नावाचा कर्तृत्ववान राजा चौथ्या शतकात याच घराण्यात होऊन गेला.[४] 'फु-ना-न' या शब्दाचा अर्थ 'पर्वतांचा राजा' असा होतो. ही मूळात एक भारतीय संकल्पना आहे.[५] नऊ फण्यांचा नाग हे फुनानचे राजचिन्ह होते. फुनानची राजधानी व्याधपूर ही होती.[६] फुनानच्या राज्यकर्त्यांचा शेजारच्या देशांशी साम्राज्यविस्ताराकरीता संघर्ष होत होता.

तेथे प्रारंभी वैष्णवपंथ प्रस्थापित झाला होता. नंतर शैवपंथ लोकप्रिय झाला होता. पल्लव आणि गुप्त या भारतीय शासकांचा विशेष प्रभाव या साम्राज्यावर होता. पल्लव संस्कृतीचा प्रभाव भारतातून आलेल्या स्थलांतरितांकडून पडला होता. फुनानच्या राज्यकर्त्यांनी हेतूतः गुप्त शासकांच्या दरबारातील प्रथा आणि प्रतिके आत्मसात केली होती.[७] इ.स. ४३४ पर्यंत कंबोजच्या भारतीयीकरणाची प्रक्रिया पूर्णपणे घडली होती. राज्याभिषेक प्रसंगी नवा राजा आपल्या नावाने एका शिवलिंगाची स्थापना करुन त्यावर भव्य मंदीर निर्माण करण्याची प्रथा प्राचीन काळात दीर्घकाळ सुरु होती.[८] दरबारी कामकाज संस्कृतमध्ये चालत होते. गुन्हा सिध्द करण्यासाठी दीव्य करण्याची प्रथा फुनानमध्ये प्रचलित होती.[९] फुनानमध्ये धार्मिक आणि पंथीय सहिष्णुता होती. जयवर्मन हा राजा शैव होता तर त्याची पत्नी आणि मुले वैष्णव होती.[१०]

फुनानमध्ये कायदा, औषधी क्षेत्रात संस्कृत शब्दांचा वापर होत असे. भारतात क्षत्रियांकरीता वापरली गेलेली 'वर्म-न' ही संज्ञा फुनानमध्ये राजकीय बिरुद बनली होती. 'ईश्वर' हा शब्द तेथे लोकप्रिय होता.[११] भारतीय मुळाक्षरे, संस्कृतभाषा, प्रशासन व्यवस्था, संस्कृत विव्दानांना तसेच मंदीरांना देणग्या देण्याची प्रथा आणि शैव-वैष्णव पंथ व मंदीरांचे अवशेष यावरुन भारतीय प्रभाव स्पष्ट होतो. भारतीय पध्दतींची नावे, नृत्य, संज्ञा, नद्यांची नावे यावरुन ही भारतीयता दिसून येते. तेथे हिंदू मंदीरे व मूर्त्या विपुल प्रमाणात आढळतात.[१२] मृतांच्या रक्षेचे नदी किंवा समुद्रात विसर्जन करणे, राजाची सजवलेल्या हत्तीवरुन सवाद्य मिरवणूक काढणे या भारतीय प्रथा तेथे अस्तित्वात होत्या.

चेनला राजवट

फुनान साम्राज्याच्या पतनानंतर इ.स. ५३९ पासून चेनला नावाचे नवे घराणे सत्तेवर आले. ते स्वतःला ख्मेर वंशाचे म्हणत होते. 'ख्मेर आणि मेरा' या दोन शब्दांपासून 'ख्मेर' हा शब्द विकसित झाला होता.[१३] श्रुतवर्मन किंवा श्रेष्ठवर्मन हा या साम्राज्याचा संस्थापक होता. त्याने श्रेष्ठपूर ही आपली राजधानी वसवली होती. तसेच भद्रेश्वर नावाचा एक नविन धार्मिक शैवपंथांतर्गत पंथ सुरु केला होता.[१४] महेंद्रवर्मन, इंद्रवर्मन हे नंतरच्या काळात राजे झालेले महत्त्वाचे राजे होते. इंद्रवर्मनने विष्णुपूर ही नवी राजधानी वसवली होती. जयवर्मन हा शेवटचा राजा ठरला.

ख्मेर राजवट / अंगकोरवट काळ

इ.स. ७९० मध्ये जयवर्मन दुसरा याने या राजवटीची स्थापना केली. त्याने साम्राज्यविस्तार घडवला. त्याने केलेला राज्याभिषेक समारंभ अतिभव्य स्वरुपाचा होता. त्यासाठी भारतातून ब्राह्मण बोलावले होते. मुख्य पुरोहिताने त्यास दैवी तलवार देऊन ' चक्रवर्ती' घोषित केले होते. त्याने 'परमेश्वर' ही उपाधी धारण केली होती.[१५] तसेच देवराज नावाचा पंथ सुरु केला. ख्मेर शासकांनी विष्णू व महादेवाची अनेक मंदीरे बांधली होती. इंद्रेश्वर महोदव मंदीर, यशोधरपूर येथील ब्रह्मा, विष्णु, शिव आणि बौध्द मंदीरे विशेष प्रसिध्द होती. जयवर्मन चौथा या राजाने आपल्या राजधानीत ११५ फुट उंचीचे पाचमजली मंदीर बांधले होते.[१६]

ख्मेर शैली

मंदीर बांधकामाबाबत कंबोडीयन वास्तुशैली जगात सर्वात भव्य आणि अप्रतिम मानली गेली आहे. विविध राजवटींच्या काळात विशेषतः राजे लोकांच्या आवडीनुसार बांधकामात परिवर्तन होत गेली. आणि तेथे अनेक वास्तुरचनाशैली काळानुरुप विकसित होत गेल्या. यांपैकी सर्वोच्चस्थान अंगकोखट शैली, बेयॉन शैली, बेंताईश्री यांचे आहे. अंगकोरवटचे विष्णु मंदीर हे जगातील सर्वात मोठे हिंदू मंदीर आहे. युनेस्कोने या अवशेषांना जागतिक धरोहर घोषित केलेले आहे. अंगकोरवटचे मुख्य मंदीर ४८००० यार्ड चौरस क्षेत्रफळाचे आहे. यातील प्रत्येक बाजू २०० यार्डाची होती. या मंदीराचे प्रारुप, आणि सर्व बाजूंवर समान भार विभाजनाचे तंत्रज्ञान प्रशंसनिय आहे.[१७] अंगकोरवटचा परिसर ४०० मैलांचा आणि १५० मंदीरांचा आहे. तेथे गेले की स्वर्गभूमीत गेल्याचा भास होतो. येथील मंदीरांच्या घडवणुकीत शिखरांवर देवतांचे चेहरे पहावयास मिळतात. मंदीराचे प्रतिबिंब भोवतालच्या तलावातील पाण्यात विलक्षण विलोभनीय दिसते.[१८] ही वास्तुकला चीनच्या भींतीपेक्षाही सुंदर आहे. तेथील दगड जिवंत वाटतात. येथील भारतीय प्रभाव स्पष्टपणे दिसतो. ही काळाने गौरवलेली वास्तु आहे.[१९]

उपसंहार

बोजवर रामायण, महाभारत, मनुस्मृती, शांतीपर्व, ज्योतिष्यविषयक ग्रंथ, यातुविद्याविषयक ग्रंथ, आयुर्वेद ग्रंथांचा विशेष प्रभाव होता. भारतातील रामलीलेप्रमाणे तेथे रामायणावर आधारीत 'राम र' अथवा 'रामकीर्ति' या नावाचा लोकप्रिय नाट्यप्रकार प्रचलित आहे. अंगकोरवट, बेयॉन इ. मंदीरांच्या भींतींवर कोरलेल्या बहुतांश शिल्पकृती रामायण-महाभारत कथानकांवर आधारीत आहेत. तेथील व्यक्तीनामे, वस्तुनामे, गावे, संज्ञा इ. सर्व भारतीय आहेत. इंद्रप्रस्थपूरम, यशोधरपूर, विष्णुपूर, व्याधपूर, अयोध्या ही तत्कालिन शहरनामे पुरेसी बोलकी आहेत.

बोडीया ही भारताची प्राचीन काळातील वसाहत होती. आणि कंबोडीयाचे पूर्णपणे भारतीयीकरण झालेले होते. ही विधाने तपासताना थोडी काळजी घ्यावी लागते. आपल्यापुढे ब्रिटीश, फ्रेंच, डच, पोर्तुग्रीज वगैरे वसाहतवादी लोकांचे चित्र उभे राहते. या लोकांनी मध्य आणि आधुनिक कालखंडात व्यापारवादाच्या प्रेरणेतून आफ्रिका-आशिया खंडात वसाहतवाद राबवला होता. त्या अनुषंगाने त्यांनी भिन्न संस्कृतीच्या वसाहतीमध्ये साम, दाम, दंड, भेद नीती वापरुन सैन्यशक्तीच्या जोरावर विजय मिळवला होता. या वसाहतींना आपले अंकित अथवा गुलाम बनवले होते. याचीच परिणती वसाहतींच्या शोषण, दमन, हत्याकांडे, अन्याय, अत्याचार यांमध्ये झाली होती. असला प्रकार भारताच्या वसाहतींमध्ये कधीही घडला नाही. मूळात ही वसाहतप्रक्रिया भारतीय राज्यकर्त्यांकडून घडली नाही. तर ब्राह्मण, बौध्दभिक्षु आणि व्यापारी वर्गाकडून घडली. या लोकांनी शांती, सदाचार आणि आत्मिक समाधानाचा संदेश घेऊन वसाहतींमधील लोकांची मने जिंकली. तेथील धर्म, संस्कृती, प्रथा, भाषा इ. सर्व राजकीय, सामाजीक, सांस्कृतिक जीवनांगांवर प्रभाव पाडून त्या देशांचे भारतीयीकरण घडवले होते.

ब्रिटीश, फ्रेंच, डच वगैरे लोकांनी त्यांच्या वसाहतींमध्ये केलेल्या अत्याचार आणि शोषणाचा इतिहास त्यांच्या आजच्या वारसांकरीता लाजीरवाना ठरतो. याउलट भारतीयांकरीता त्यांच्या पूर्वजांनी स्थापन केलेल्या वसाहती, तेथे राबवलेली धोरणे आणि भारतीय संस्कृतीचा तेथे केलेला प्रचार सार्थ अभिमानास्पद आहे. कंबोडीयातील लोकांनाही आपल्या भारतीय पूर्वजांचा अभिमान वाटतो. भारताला ते आपला ज्येष्ठ बंधू मानतात. आणि भारतीय संस्कृतीचे अनुगमन करण्यात धन्यता मानतात ही बाब लक्षणीय आहे.

साधने :-

1) M.Ghosh, *A History of Combodia*, Oriented Books Agency Company, Calcutta, 1968 P-29 to 26.
२) सेनगर जी.एस, *भारत कंबोज संबंध*, १९८५ पृ. ४९
3) Cady John F., *South East Asia - Its Historical Development*, McGraw Hill Book Company, New York, 1964 P-51
4) Harrison Brian, *South East Asia - A Short story*, The Mcmillian press, London, 1966 P-21
5) Shastri K.A. Nilkantha, *South Indian Cultural Influences in the Far East*, Hind Kitabs, 1949 P-28
6) http://en.wikipedia.org/wiki/Geography=of-combodia retrieved on 21-11-2012
7) Moorland M.J., *A History of Malaya & Her Neighbours*, 1957 P-52 to 53
8) G.Coedes, *Pour Mieux comprendre Angkor*, 1943,I, P-96 to 100
9) Cady John F., Op-cit, P- 52 & 53
10) Brings L.P., *The Syncretism of Religions in South East Asia*, JAOS LXXI, 1951 P - 239 to 247
11) Cady John F. Op-cit, P- 55
12) M. Ghosh,. Op-cit, P- 46 to 48
13) G.Coedes, *The making of South East Asi* a, University of California Press 1983, P-88
14) Ibid, P-89
15) Manjumdar R.C., *Kambujadesa*, Read Books, University of Madras, Madras, 1944 P-72 to 83

16) G. Coedes, Op-cit, P- 98 to 99
17) Reginald Le may, *The Culture of South East Asia*, Gorge Allen & Uniwin Ltd., London, P-135 to 136
१८) *मंदीराची स्वर्गभूमी अंगकोर*, दै.सकाळ, नागपूर आवृत्ती, पुरवणी स्मार्ट सोबती, दि. ८ सप्टेंबर २०११ गुरुवार
19) Sitwall Sir Osbert in *Escape with Me*, Quoted from Reginald Le May, *The Culture of South East Asia,* Op-Cit, P- 125